पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग कार्यालय

**कार्यपत्रिका क्र. ९**

**सभावृत्तांत**

दिनांक : ०९/१०/२०१३ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१३ ची मासिक सभा बुधवार दिनांक ०९/१०/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता अ प्रभाग कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित करण्यात आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. जावेद रमजान शेख - अध्यक्ष
२) मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३) मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस के बापू
४) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५) मा. सौ.भालेकर अरुणा दिलीप
६) मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७) मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८) मा. सौ.जाधव साधना रामदास
९) मा. जाधव राहूल गुलाब
१०) मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
११) मा. सौ.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१२) मा.सौ.बोऱ्हाडे शुभांगी संजय
१३) मा. मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
१४) मा. सौ. भारती फरांदे
१५) मा.आर.एस.कुमार
१६) मा.सौ.चारुशीला प्रभाकर कुटे
१७) मा.सौ.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
१८) मा.अविनाश (दादा) टेकवडे
१९) मा. सौ.काळभोर वैशाली जालिंदर

याशिवाय मा.श्री.ज्ञानेश्वर ढेरे, प्रभाग अधिकारी, मा.आय.वाय.सय्यद, कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.श्री.मिलींद कपिले, कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.लियाकत पिरजादे, कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.व्ही.डी.नगरे, प्रशासन अधिकारी, मा.श्री.पी.जी.जाधव, लेखाधिकारी, मा.श्री.के.डी.दरवडे, सहा.आरोग्याधिकारी, मा.श्री.एकनाथ ढवळे, उपअभियंता(जल नि:सारण), मा.श्रीम.लता बाबर, उपअभियंता (विद्युत), श्री.रावके, सहा.पर्यवेक्षक, वृक्षसंवर्धन इ. अधिकारी उपस्थित होते.

मा.अध्यक्ष यांनी उपस्थित सन्माननिय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

अ) दिनांक ११/०९/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता तहकुब करणेत आलेल्या व सोमवार दिनांक २३/०९/२०१३ रोजी दुपारी १२.०० वा. घेणेत आलेल्या माहे सप्टेंबर २०१३ चे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र. ८ ) कायम करणेत आलचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

मा.अध्यक्ष यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र. २ — मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा प्रस्ताव
मनपाचे आकुर्डी रुग्णालयाचा विस्तार करणेबाबत.

विषय क्र. ३ — मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.१६ मध्ये खेळाचे मैदान व गार्डन तयार करणेबाबत.

विषय क्र. ४ — मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा प्रस्ताव
डिव्हायडर बसविणेबाबत.

विषय क्र. ५ — मा. वैशाली जालिंदर काळभोर यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र. २६, काळभोरनगर येथील सांस्कृतीक भवनाचे नामकरण करणेबाबत.

विषय क्र. ६ — मा. राहुल जाधव यांचा प्रस्ताव
मंजुर विकास आराखड्यातील रस्त्याची हद्द कायम करुन मिळण्याबाबत.

विषय क्र. ७ — मा. सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव
सारथी हेल्पलाईनच्या तक्रारी संबंधित नगरसदस्यांना पाठविणेबाबत.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा. श्री.नारायण बहिरवाडे — अनुमोदक: मा.श्री.अविनाश टेकवडे

अ प्रभागातील सन्मा. नगरसेवक मा.श्री.जगदीश शेट्टी व मा.श्री.उल्हास शेट्टी यांचे थोरले बंधु श्री.प्रसाद शेट्टी यांचे नुकतेचे निधन झाले आहे. तसेच मनपाचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.अनिल रॉय यांच्या मातोश्री श्रीमती. अमिनी रॉय यांचेही नुकतेच निधन झाले असलेने त्यांना आज होणाऱ्या प्रभाग समितीच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

सदरची सूचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.

(उपस्थितांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १९४ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : ०९/१०/२०१३ | विभाग | : लेखा |
| सुचक | : मा. सुरेश म्हेत्रे | अनुमोदक | : मा. शांताराम भालेकर |

संदर्भ: मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
अप्र/लेखा/७अ/ कावि/९७/२०१३ दिनांक ४/१०/२०१३

अ प्रभाग प्रशासन विभागाकडील मा.प्रभाग अधिकारी व प्रशासन अधिकारी यांचे वाहनाकरीता लागणाऱ्या इंधनाची बीले स्थायी अग्रिमधन मधून वाहन इंधन या लेखाशिर्षावर खर्ची टाकण्यात येतात. सदर लेखाशिर्षावर सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये र.रु. २,००,०००/- तरतूद करणेत आलेली आहे. त्यापैकी दिनांक २५/०९/२०१३ अखेर र.रु. १,९९,५७३/- इतका खर्च झालेला असून र.रु.४२७/- शिल्लक आहे. यापूढील बीले खर्ची टाकणेकामी सदरची रक्कम अपुरी पडत असलेने स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर असलेली एकूण तरतूद र.रु. २,४२,००,०००/- पैकी दिनांक १७/०९/०१३ अखेर शिल्लक असलेल्या र.रु. १,३९,८६,८८३/- मधून र.रु. २,००,०००/- वाहन इंधन या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १९५ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : ०९/१०/२०१३ | विभाग | : स्थापत्य/ वैद्यकीय |
| सुचक | : मा. प्रतिभा भालेराव | अनुमोदक | : मा. भारती फरांदे |

संदर्भ: मा. प्रतिभा भालेराव यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकुर्डी रुग्णालयामध्ये प्रसुतीगृह, कुटुंबकल्याण, जन्ममृत्यू व दैनंदिन रुग्ण तपासणीची कामे केली जातात. सदर रुग्णालय हे अपुरे पडत असून त्याचा विस्तार करणे अत्यंत गरजेचे आहे. रुग्नालयाचे शेजारी आरक्षण क्र. २७१ ही अडीच एकर जागा आहे. या जागेवर असलेले खाजगी शाळेचे आरक्षण रद्द करुन ती जागा रुग्नालयाच्या विस्तारासाठी आरक्षित करणेस मान्यता देणेकामी सदरचा विषय मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १९६ | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : ०९/१०/२०१३ | विभाग | : स्थापत्य/ उद्यान/ क्रिडा |
| सुचक | : मा. प्रतिभा भालेराव | अनुमोदक | : मा. भारती फरांदे |

संदर्भ: मा. प्रतिभा भालेराव यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.१६ मध्ये जय-गणेश व्हिजन या संस्थेने महापालीकेस ओपन स्पेसचे माध्यमातून दोन एकर जमीन ताब्यात दिली असून ती जमीन मनपाचे ताब्यात आहे. सदर जागेचा आरक्षण क्र. १७१ आहे व ती एल आकाराची आहे. प्रस्तूत जागेपैकी एक एकर जागेमध्ये खेळाचे मैदान विकसीत करणेस व एक एकर जागेमध्ये गार्डन विकसीत करणेस मान्यता देणेकामी सदरचा विषय मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १९७ | विषय क्रमांक | : ४ |
| दिनांक | : ०९/१०/२०१३ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. प्रतिभा भालेराव | अनुमोदक | : मा. भारती फरांदे |

संदर्भ: मा. प्रतिभा भालेराव यांचा प्रस्ताव

खालील ठिकाणी डिव्हायडर बसविणेबाबत

१) खंडोबा चौक ते आकुर्डी हॉस्पीटल व पुढे कर संकलन ऑफिसकडे वळणाऱ्या रत्यावर.
२) गणेश नगरी ते म्हाळसाकांत चौक पर्यंत जुने डिव्हायडर काढून नवीन मोठे डिव्हायडर बसविणे.
३) म्हाळसाकांत चौक ते पुढे रेल्वे लाईनकडे जाणाऱ्या रस्त्यावर.
४) गंगानगर ते सुभाष पांढरकर नगर रस्त्यावर.

वरील ठिकाणी डिव्हायडर बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १९८ | विषय क्रमांक | : ५ |
| दिनांक | : ०९/१०/२०१३ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. वैशाली काळभोर | अनुमोदक | : मा. दत्तात्रय साने |

संदर्भ: मा. वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्र.२६ काळभोरनगर येथील स.नं. १३५ येथे नव्याने विकसीत करण्यात आलेल्या सांस्कृतीक भवनास "कै.नारायणशेठ विष्णू काळभोर सांस्कृतीक भवन" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १९९ | विषय क्रमांक | : ६ |
| दिनांक | : ०९/१०/२०१३ | विभाग | : नगररचना |
| सुचक | : मा. राहुल जाधव | अनुमोदक | : मा. नारायण बहिरवाडे |

संदर्भ: मा. राहुल जाधव यांचा प्रस्ताव

कुदळवाडी जाधववाडी हा प्रभाग समाविष्ट गावातील असून वाढत्या लोकसंख्येचा विचार करता कुदळवाडी जाधववडी प्रभाग क्र.५ मधील मंजूर विकास आराखडयातील गट नं. ९८६, ९७०, ९७१, ९६४, ९२७, ९०१ या गटातील १८ मीटर रस्त्याचे आरक्षण असुन त्या रस्त्याची हद्दी कायम करणेस मान्यत देणेकामी मा.शहर सुधारणा समिती सभेकडे पाठविणेस शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २०० | विषय क्रमांक | : ७ |
| दिनांक | : ०९/१०/२०१३ | विभाग | : ई-गव्हर्नन्स / ना.सु.के. |
| सुचक | : मा. सुरेश म्हेत्रे | अनुमोदक | : मा. आर.एस.कुमार |

संदर्भ: मा. सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव

सारथी हेल्पलाईन द्वारे नागरीक ज्या तक्रारी करीत असतात त्या तक्रारी पूर्तता करणेकामी संबंधित विभाग प्रमुख, शाखाप्रमुख किंवा अधिकारी यांचेकडे वर्ग करणेत येतात. अशा वर्ग करणेत येणाऱ्या तक्रारी ज्या प्रभागातील आहेत त्या प्रभागातील दोन्ही नगरसदस्यंना त्यांचे ई-मेलवर किंवा दूरध्वनीवर पाठविणेस तसेच याकामी संबंधित विभागास आवश्यक कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

यानंतर मा.अध्यक्ष यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

(श्री.जावेद शेख)
अध्यक्ष
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग समिती
अप्र/११/ कावि/ /२०१३
दिनांक : / १०/२०१३

प्रशासन अधिकारी
अ प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी ४४